मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 06.08.2020
टिपणी क्रमांक आर/..294/others
जावक दिनांक 7/8/2020

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## परिपत्रक क्र.२२५/२०२०

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आवारातील वसतिगृहामध्ये २०१९–२० या शैक्षणिक वर्षात राहात असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की कोवीड–१९ (कोरोना) या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीमुळे वसतिगृह सोडतेवेळी विद्यार्थ्यांचे साहित्य ( पुस्तके, कपडे, लॅपटॉप इत्यादी ) वसतिगृहातील खोलीमध्ये राहिले आहे व त्या सामानाची आवश्यक्ता असल्यास संबंधीत विद्यार्थ्यांना स्वतःचे साहित्य घेवून जाण्याची व्यवस्था वसतिगृह कार्यालयाकडून करण्यात आलेली आहे.

सदरील साहित्य घेवून जाण्यासाठी संबंधीत विद्यार्थ्यांनी खालीलप्रमाणे प्रक्रिया पुर्ण करणे अनिवार्य आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

१) संबंधीत विद्यार्थ्यांचा संपूर्ण तपशील उदा. नाव, रोल नंबर, विभाग, वर्ग, वर्ष, वसतिगृह क्रमांक व खोली क्रमांक तसेच स्वतःच्या घ्यावयाचा साहित्याचा तपशील विद्यार्थ्यांनी **chiefrector@unipune.ac.in** या ई–मेलवर व विद्यार्थीनींनी **lhacr@unipune.ac.in** या ई–मेलवर कळवावा.

२) सदरील ई–मेल प्राप्त झाल्यानंतर संबंधीत विद्यार्थ्यांस लवकरात लवकर वसतिगृह भेटीचा दिनांक व वेळ कळविण्यात येईल.

३) विद्यापीठ व वसतिगृह परिसरास भेट देतेवेळी संबंधीत विद्यार्थ्यांने केंद्र व राज्यसरकार/विद्यापीठ/अन्य अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशांचे वेळोवेळी व ततोंतंत पालन करणे अनिवार्य आहे.

( डॉ. प्रफुल्ल पवार )
कुलसचिव

मुख्य वसतिगृह प्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे–४११००७.

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
संदर्भ क्र : साफुपुवि/वसतिगृह/२०२०–२१/७६२
दिनांक : ०६/०८/२०२०

प्रत माहितीसाठी सादर :–
मा. विभागप्रमुख :– आपल्या विभागातील वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या निर्दशनास आणून द्यावे, ही विनंती.